RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ




शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५ | वर्ष : ५ | अंक : १४९ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Friday 15 August 2025 | Year : 5 | Issue : 149 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्त्वाच्या बातम्या

### भारत-चीन सीमा व्यापार पुन्हा सुरु करणार?

भारत आणि चीन सीमा पारून नियमित वस्तूंचा व्यापार 5 वर्षांनंतर पुन्हा सुरू करण्यासाठी चर्चा सुरू आहेत. हे Bloomberg च्या अहवालानुसार, नवी आर्थिक सहकार्याची शक्यता दर्शवत आहे.

### पाकिस्तानकडे कडक इशारा

परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तानाला 'उग्र' आणि 'युद्धप्रवण' भाषण पुन्हा न करण्याचा इशारा दिला आहे; तसेच, असे विधान कोणत्याही 'दुःखद परिणाम' सोडवू शकतात, अशी दहशतवर्धक टिप्पणी करण्यात आली आहे.

### स्वतंत्रता दिनासमोर पावसामुळे गोवा आणि उत्तर भारतात शाळा बंद

लखनऊसारख्या अनेक भागात सणपूर्वी पावसामुळे शाळा बंद करण्यात आल्या; दिल्ली-एनसीआरमध्येही मुसळधार पाऊस आणि हवामान चेतावण्या जारी केल्या गेल्या, ज्यामुळे स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली.

### छत्तीसगढमध्ये 14 जणांच्या गावांमध्ये तिरंगा फडकवणार—पहिल्यांदाच!

छत्तीसगढच्या बस्तर विभागातील 14 दूरस्थ आदिवासी गावांमध्ये या वर्षी पहिल्यांदा स्वतंत्रतेच्या तीन रंगांचा ध्वजास मानले जाणार आहे. हे गाव पूर्वी माओवादी प्रभावाखाली असल्यामुळे उत्सव रद्द झाले होते; पण आता सुरक्षात्मक रांगण स्थापनेमुळे हा ऐतिहासिक क्षण घेऊन येत आहे.

### मुंबईत सांताक्रुझ- चेंबुर लिंक रोड विस्तार आजपासून सुरू

मुंबईतील Santacruz–Chembur लिंक रस्त्याचा विस्तार आज उद्घाटित होणार आहे. यामुळे पाश्चिम दिशा आणि पूरब दिशेतील वाहतुकीची सोय सुधारण्याची अपेक्षा आहे. यात एक खास कैबल-स्टेड ब्रिजचा समावेश असून, सिग्नल-फ्री मार्गामुळे प्रवासाचा वेळ 15-20 मिनिटे कमी होण्याची शक्यता आहे.

### मेरठला नावच नाही, पण स्वातंत्र्यापासूनचा 79 वा उत्सव?

2025 साली स्वातंत्र्यदिन साजरा करण्याची ही 79वी बार आहे. -1947 पासूनचा पहिला उत्सव मोजून, हे व्यक्त होतो.

### मध्यपूर्व मुद्द्यावर भारताचा राजकीय दृष्टीकोन : इस्त्राएल-गाझा संघर्ष

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने गाझा समस्येवर टिकाव धरत, तात्काळ संघर्ष विराम, बंद्यांची सुट्टी, आणि मानवी साहाय्य संपर्क कायम ठेवण्याचे आव्हान दिले आहे; तसेच, दोन राज्यांवर आधारित निराकरणाच्या बाजूने भारताची भूमिका स्पष्ट आहे.

## सुटीची सूचना

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त मुद्रणालयाला सुटी असल्यामुळे दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजीचा दै. बहुजन सौरभचा अंक प्रकाशित होणार नाही. नियमित अंक दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी वाचकांना प्राप्त होईल. याची वाचक, जाहिरातदार व वितरकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

आयु. माणिकराव अमृत महोत्सव समिती तर्फे सर्व भारतीय नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक मंगलकामना!!!



:-शुभेच्छुक :-
आत्माराम ढोक, शालिक जिल्हेकर, वामन नील, संजय सायरे, संजय गोडघाटे, प्रकाश कांबळे, जगदीश राऊत, प्रकाश बावनगडे, रंगराज गोस्वामी

#### लोक आधार वापरून दावा दाखल करू शकतात

# सर्वोच्च न्यायालयाने 65 लाख मतदारांची मागितली माहिती...



**नवी दिल्ली :** बिहारमधील मतदार यादीच्या पुनरीक्षणावरून सुरू असलेल्या वादावरील सुनावणीदरम्यान, निवडणूक आयोगाने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात आपले युक्तिवाद सादर केले. युक्तिवाद सुरू करताना, निवडणूक आयोगाने न्यायालयाला सांगितले की त्यांच्याकडे काही निर्णय घेण्याचे पुरेसे अधिकार आहेत. या दरम्यान, निवडणूक आयोगाने जिल्हा स्तरावर मृत, स्थलांतरित किंवा हस्तांतरित मतदारांची यादी सर्वोच्च न्यायालयात शेअर करण्यास सहमती दर्शविली. यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला 19 ऑगस्टपर्यंत मतदार यादीतून काढून टाकलेल्या 65 लाख मतदारांची ओळख उघड करण्यास सांगितले. न्यायालयाने 22 ऑगस्टपर्यंत अनुपालन अहवाल मागितला.

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयात काढून टाकण्यात आलेल्या 65 लाख मतदारांची माहिती कारणासह प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने निवडणूक आयोगाला वृत्तपत्रे, रेडिओ आणि टीव्ही माध्यमांद्वारे कारणासह काढून टाकण्यात आलेल्या मतदारांची यादी व्यापकपणे प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले. बिहारमध्ये प्रारूप मतदार यादीतून नावे वगळण्यात आल्याने त्रस्त असलेले लोक आधार कार्डसह दावा सादर करू शकतात. यासह न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी तहकूब केली.

*निवडणूक आयोगाने असेही म्हटले आहे की राजकीय द्वेषाच्या वातावरणात काम करतांना, असा कोणताही निर्णय क्वचितच येतो जो वादग्रस्त नसतो. आपण राजकीय पक्षांमधील संघर्षात अडकलो आहोत. जर ते जिंकले तर ईव्हीएम चांगले असते आणि जर ते हरले तर ईव्हीएम वाईट असते. बिहारमधील एसआयआरवर निवडणूक आयोगाने म्हटले आहे की एका अंदाजानुसार, बिहारमधील सुमारे 6.5 कोटी लोकांना एसआयआरसाठी कोणतेही कागदपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.*

सुनावणीदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला विचारले, 'तुम्ही मृत्युमुखी पडलेल्या किंवा स्थलांतरित झालेल्या किंवा इतर मतदारसंघात स्थलांतरित झालेल्यांची नावे का सांगू शकत नाही?' न्यायालयाने असेही म्हटले की तुम्ही ही नावे डिस्प्ले बोर्ड किंवा वेबसाइटवर का टाकू शकत नाही? यामुळे पीडितांना 30 दिवसांच्या आत सुधारणात्मक उपाययोजना करता येतील.

### निवडणूक आयोगाचा युक्तिवाद, न्यायालयाचा सल्ला

निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, मृत, विस्थापित किंवा स्थलांतरित लोकांच्या नावांची यादी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना देण्यात आली आहे. यावर न्यायालयाने म्हटले की, नागरिकांचे हक्क राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांवर अवलंबून राहावेत असे आम्हाला वाटत नाही. डिस्प्ले बोर्ड किंवा वेबसाइटवर मृत, विस्थापित किंवा स्थलांतरित मतदारांची नावे प्रदर्शित केल्याने अनवधानाने झालेल्या चुका सुधारण्याची संधी मिळेल. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, वेबसाइट्स, ठिकाणांच्या तपशीलांसाठी सार्वजनिक सूचना जारी करण्याचा विचार करा जिथे 'मृत, विस्थापित किंवा स्थलांतरित' लोकांची माहिती शेअर केली जाते.

# पहलगाम घटनेकडे दुर्लक्ष करता येणार नाही...

### जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीवर सर्वोच्च न्यायालयाचा निकाल



**नवी दिल्ली :** जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी केली. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, राज्याचा दर्जा बहाल करतांना जमिनीवरील परिस्थिती लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. मुख्य न्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने म्हटले की, पहलगाममध्ये घडलेल्या घटनेकडे तुम्ही दुर्लक्ष करू शकत नाही. केंद्राच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता उपस्थित राहिले. त्यांनी सांगितले की, सरकारने निवडणुकीनंतर राज्याचा दर्जा पुनर्संचयित करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु तेथील परिस्थिती काहीशी वेगळी आहे. ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या संविधान खंडपीठाने कलम 370 रद्द करून जम्मू-काश्मीरचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन करण्याचा निर्णय दिल्यानंतर, विधानसभा निवडणुका घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते आणि निवडणुकाही घेण्यात आल्या. ते असेही म्हणाले की, ही परिस्थिती आणखी गुंतागुंतीची करण्याची वेळ याचिकाकर्त्यांसाठी नाही. मेहता यांनी या प्रकरणात सरकारकडून सूचना घेण्यासाठी आठ आठवड्यांचा वेळ मागितला. जम्मू आणि काश्मीरला लवकरात लवकर राज्याचा दर्जा बहाल करण्याचे निर्देश केंद्र सरकारला द्यावेत अशी मागणी करणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. या याचिकांमध्ये म्हटले आहे की, केंद्र सरकारने यापूर्वी राज्याचा दर्जा बहाल करण्याचे आश्वासन दिले होते, त्यामुळे आता जम्मू आणि काश्मीरला पुन्हा राज्य बनवण्यासाठी न्यायालयाने कालबद्ध पद्धतीने निर्देश देणे आवश्यक आहे. शिक्षक झहूर अहमद भट आणि सामाजिक कार्यकर्ते खुर्शीद अहमद मलिक यांनी या याचिका दाखल केल्या आहेत. याचिकेत म्हटले आहे की, याचिकाकर्ते जम्मू आणि काश्मीरचे जागरूक नागरिक आहेत आणि 11 ऑगस्ट 2023 च्या आदेशाच्या 10 महिन्यांनंतरही राज्याचा दर्जा पुनर्संचयित करण्यासाठी कोणतीही पावले उचलली गेली नाहीत हे पाहून त्यांना दुःख झाले आहे. यामुळे जम्मू आणि काश्मीरमधील नागरिकांच्या हक्कांवर परिणाम होत आहे


















“ 78 व्या स्वातंत्र्यदिनाच्या सर्व देशवासियांना हार्दिक शुभेच्छा !... ”



# स्वातंत्र्य दिन कोणाचा?

*इथे कोण स्वतंत्र झाले आहे? केंव्हा स्वतंत्र झाले आहे? इथे कोणाला कोणापासून स्वातंत्र्य मिळाले आहे? काय 85 टक्के भारतीय नागरिकांना खरेच स्वातंत्र्य मिळाले आहे? काय भारत देश सर्वांगीण अर्थाने स्वातंत्र्य झाला आहे? केवळ ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून सुटका झाली म्हणजे काय तो स्वतंत्र झाला? आणि मग पुढे तो ब्राह्मण्यवाद्यांच्या, मनुवाद्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय गुलामगीरीत जखडला त्याचे काय? त्याला तर आज ही या मनुवादी गुलामीतच जीवन जगायला भाग पाडल्या जात आहे आणि त्यातच त्याचे मरण आहे. मग हे स्वातंत्र्य कसे?*

वर्तमान लक्षात घेता, देशाला धोका कोणापासून आहे? मनुवाद्यांपासून की पाकिस्तान वाद्यांपासून? आणि असा हा स्वातंत्र्य दिन साजरा करणे म्हणजे काय? या देशाने 15 ऑगस्ट दिनी स्वातंत्र्य-स्वातंत्र्य असे झेंडे मिरवणे म्हणजे काय? ब्रिटिशांच्या गुलामीच्या, जूलमी बेड्या आमच्या असंख्य वीरांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन तोडल्या आणि भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. हे स्वातंत्र्य आज कोणाच्या ताब्यात आहे? मुठभरांच्या की ढिगभरांच्या? देशहितकर्त्यांच्या की देशाच्या दुश्मनांच्या? मग अशा या देशाच्या दुश्मनांच्या ताब्यातून भारत देश स्वतंत्र कधी करायचा? त्यासाठी स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढायला सज्ज कधी व्हायचे? गोरे गेले आणि काळे आले एवढाच काय तो बदल. पण दोघेही सारख्याच वृत्तीचे. स्वातंत्र्यानंतर ही देशात पुन्हा तोच पाढा. जातीय धर्मीय फूट पाडा. त्यांना फोडा आणि झोडा. याचा पुरावा म्हणजे स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षानंतर सुद्धा भारत देश जाती मूक्त झाला नाही? तो का होऊ दिला नाही? देशात आजही सर्वांना धर्मस्वातंत्र्य नाही. हिंदूकडूनच हिंदूला तो दलित हिंदू आहे म्हणून मंदिरात प्रवेश नाकारला जातोय. काय भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेदांची, मूलभूत हक्क, आधिकारांची अंमलबजावणी देशात होतेय? ती का केली जात नाही? याला जबाबदार कोण? नुसतेच हर घर तिरंगा आणि स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव असे इव्हेंट बिरुद चिटकवून देशाच्या हाती कोणती देशभक्ती लागली? देशाला कोणते स्वातंत्र्य लाभले? देशातून कोणती गरिबी नाहीशी झाली? देशातील नागरिकांना कोणता सामाजिक न्याय लाभला? काय नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळतेय? काय नागरिकांना बोलण्याचे स्वातंत्र्य मिळतेय? काय लिहीण्याचे स्वातंत्र्य मिळतेय? की बोलले लिहिले म्हणून त्यांना कारागृहात डांबले जातेय? काय रस्त्यावर उतरून शांततामय मार्गाने आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संघर्ष करणारे विद्यार्थी, तरूण, सुशिक्षित बेरोजगार, शिक्षक, नोकरदार, शेतकरी, कष्टकरी, कामगार, शेतमजूर, गोरगरीब, बेघर, भूमिहीन यांना न्याय मिळतोय? यांना स्वातंत्र्याचे लाभ मिळतात? की त्यांच्यावर क्रूर लाठीहल्ला करण्यात येतो? की त्यांच्याविरुद्ध खोटे गुन्हे दाखल करून त्यांना आयुष्यातून आणि भविष्यातून उद्धवस्त करण्यात येतेय? मग हे कसले स्वातंत्र्य? हे कोणाचे स्वातंत्र्य? हा कोणाचा स्वातंत्र्य दिन? जर या देशात नागरिकांना त्यांचे सन्मानाने जीवन जगण्याचे संविधानिक हक्क आणि अधिकार मिळत नसतील, सरकार ते जाणीवपूर्वक देत नसेल, तर हे कसले स्वातंत्र्य? हे कोणासाठीचे स्वातंत्र्य? सध्या देशाचे आणि राज्याचे काय चित्र आहे? तर 'विद्यार्थी शाळा बंद' आणि 'गोशाळा सुरू.' नोकरभरती बंद आणि दारूची दुकाने सुरू. असे देश बुडवे धोरण राबवणाऱ्यापासून देशाला वाचवायचे आहे. हे स्वातंत्र्य देशाला मिळवून द्यायचे आहे. देशासोबत नौटंकी करणाऱ्यांपासून देशाला वाचवायचे आहे. हे खरे स्वातंत्र्य देशाला मिळवून द्यायचे आहे. नागरिकांच्या मतांची चोरी करणाऱ्या चोरांपासून देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यायचे आहे. लोकशाही मोडीत काढणाऱ्या झुंडीपासून देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यायचे आहे. देशाच्या सार्वजनिक आणि शासकीय संस्था, अस्थापना आणि संपत्ती गहाण टाकणे आणि विकणाऱ्यांपासून देशाला स्वातंत्र्य पाहीजे. प्रत्येकाच्या खात्यात पंधरा लाख रू. टाकू, या खोट्या थापांपासून देशाला स्वातंत्र्य पाहीजे. वर्षाला दोन कोटी नोकऱ्या देऊ, अशा खोट्या भूलथापा देणाऱ्यांपासून देश आधी स्वतंत्र झाला पाहीजे. त्याचबरोबर या देशात 'चोरांची' आणि ते करीत असलेल्या 'चोऱ्यांची' संख्या मागच्या दहा वर्षांत प्रचंड वाढली आहे. निवडणूक आयोगाकडून नागरिकांच्या मतांची चोरी, डिजीटल इंडिया कडून डेटा चोरी, जीएसटी, सीएसटी द्वारे नागरिकांच्या पैशांची चोरी, पीएम फंडात जमा झालेल्या नागरिकांच्या पैशांची चोरी करणाऱ्यांपासून देश स्वतंत्र करायचा आहे. जर असे करायचे नाही तर मग काय फक्त या चोरांच्या आणि लबाडांच्या उदोउदोसाठीच दरवर्षी स्वातंत्र्य दिन मानायचा? काय यासाठीच स्वातंत्र्य दिन साजरा करायचा? तर अजिबात नाही. 85 कोटी लोकांना रेशनवर फक्त तिन वस्तूंचे ते ही अनियमित आणि अपुरे धान्य देता, याची लाज राज्यकर्त्यांना आणि सरकारला वाटली पाहीजे. हि बाब देशासाठी भूषणावह नाही. आभिमानाची तर निश्चितच नाही. देशाची मान शरमेने खाली झुकवायला लावणारी आहे. हा देश भय, भूख, भेद, भ्रष्टाचार आणि भयानकतेपासून स्वतंत्र झाला पाहीजे. हा देश मुला मातांच्या कुपोषणाच्या, उपोषणाच्या आणि भुखमरींच्या वाढत्या संख्यापासून मुक्त झाला पाहीजे. रोज रोज होत असलेल्या शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या धुराने हा देश काळवंडून गेला आहे. काय या खुषीत स्वातंत्र्य दिन मिरवायचा? की तरूणाईला बरबाद करणारी व्यसनाधीनता वाढीस लावून, त्यांच्या मेंदूत अंधश्रद्धा, कर्मकांड, धर्मांधतेला बढावा देणाऱ्या या लुटीच्या खुषीत स्वातंत्र्य दिन मानायचा? दमन, शोषण, लूट, भयानकता, विषमता, जातीय आणि धर्मीय हिंसा हत्या, अन्याय अत्याचारांनी देश भयभीत बनला आहे, सुन्न आणि खिन्न झाला आहे. काय यासाठी स्वातंत्र्य दिन पाळायचा? देशातील आणि राज्यातील मुली महिलांचे अचानक बेपत्ता होणे, बेअक्कल बाबा बुवांची जाणीवपूर्वक संख्या वाढवून महिलांना धर्मांध शोषणाचे बळी बनवणे काय यासाठी स्वातंत्र्य दिन मानायचा? मुली महिलांवरील वाढते बलात्कार आणि हत्यांनी मानवी मन दुःखी झाले आहे. काय यासाठी स्वातंत्र्य दिन मानायचा. काय अशा परिस्थितीत स्वातंत्र्य दिन खुषीत मिरवायचा? इथे कोण सुरक्षित आहे? सांगा इथे कोण सुरक्षित आहे? शेतकरी सुरक्षित आहे? बेरोजगार सुरक्षित आहे? मुली महिला सुरक्षित आहेत? लहान मुले सुरक्षित आहेत? इथे कोणाला स्वातंत्र्य मिळालेय? इथे कोण स्वातंत्र्य उपभोगतोय?

आणि कोणते स्वातंत्र्य? या देशातील मुस्लिम, दलित, ख्रिश्चन, आदिवासींवरील वाढते हल्ले, हत्या. त्यांच्या उपासनेची ठिकाणे विहारे, मशिदी, चर्चच्या अस्तित्वावरील हल्ले हे या देशातील स्वातंत्र्याचे हे तत्व आहे काय? आणि हे जुलमी स्वातंत्र्य आम्ही मानायचे आणि मिरवायचे काय? भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत हे ब्रीदवाक्य कोणी पाळायचे? हे तत्व स्वातंत्र्यानंतर या देशात रूजू न देणारे देशद्रोही कोण?

देशात प्रचंड वेगाने वाढत असलेली लोकसंख्या, वाढती भयावह महागाई, गोरगरीबांची रस्त्यावरील फूटपाथवरील वाढती संख्या, हे कशाचे द्योतक आहे? गुलामीचे की स्वातंत्र्याचे? सरकारचे हे आद्य कर्तव्य आहे की, त्याने प्रत्येक भारतीय नागरिकांस संविधानिक, मानवीय आणि सर्वांगीण हक्क, अधिकार, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय दिला पाहीजे. तो प्रत्येक भारतीय नागरिकांचा जन्मसिद्ध अधिकार आहे. म्हणून तो मिळवण्यासाठी भारतीय नागरिक बांधवांनो, स्वातंत्र्याच्या दुसऱ्या लढाईस सज्ज व्हा. ■■





ॲड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

# अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजेच मूलभूत मानवी स्वातंत्र्य

**व्यक्तीला गुलाम करायचे असेल तर त्याला तुरूंगात टाकण्याची गरज नाही. त्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य जर बंदिस्त केले, तर तो आपोआप गुलाम होईल. ब्रिटीशांच्या गुलामीतून मुक्त होऊन स्वातंत्र्य प्राप्त करणे, म्हणजे आपण या देशाचे राज्यकर्ते होणे, हा अर्थ तर होताच, परंतू त्या मध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य, म्हणजेच विचार करण्याचे स्वातंत्र्य पहिल्या क्रमांकावर होते.**

भारतीय संविधानाने सगळ्या भारतीयांना कलम 19 (1)(अ) नुसार हे स्वातंत्र्य दिले आहे. त्या मध्ये असहमत होण्याचे, वैचारिक विरोध करण्याचे आणि स्वतःचे विचार स्वतंत्रपणे लोकशाही पद्धतीने, शांततेच्या मार्गाने मांडण्याचे अधिकार आहेत. यावर काही मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये राज्याचे सार्वभौमत्व, एकता, सार्वजनिक शिस्त, सभ्यता, नैतिकता इत्यादींची तर न्यायालयाचा अवमान, बदनामी, हिंसाचार, दोन समाजात वैमनस्य या गोष्टींना बंदी आहे.

जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांतीचे आवाहन तत्कालीन सरकार विरूद्ध केले होते आणि आणीबाणी जर अभिव्यक्ती स्वातंत्र्याविरूद्ध होती, तर मग जनसुरक्षा कायदा 2024 काय आहे? या कायद्यासंदर्भात महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. हिंसेचा आंदोलनात्मक मार्ग जर कोणी अमलात आणत असतील, तर तो निश्चितच संविधान विरोधी आहे आणि त्याचा प्रतिबंध करणारे कायदे यापूर्वीही अस्तितवात आहेत. हे विधेयक कोणत्या समाजाच्या सुरक्षेसाठी सर्वोच्च आहे? हा कायदा एक द्वि-धार असलेले शस्त्र मानला जातो. जिथे एका बाजूने तो गंभीर गुन्हे रोखण्यास मदत करतो, तर दुसऱ्या बाजूने त्याच्या गैरवापराची शक्यता सदैव अस्तित्वात असते.

भारतीय संविधानाचे रक्षण करणे हे उदिष्ट सांगितले गेले. कडवी डावी विचारसरणी असलेले व भारतीय संविधानाविरुद्ध चीड निर्माण करणारे लोक आपल्या समाजाची शांतता बिघडविण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रवृत्तीविरुद्ध कायदेशीरदृष्ट्या दोन हात करण्याची तयारी या विधेयकात असल्याचे सांगितले गेले. त्यामध्ये कायद्याचा गैरवापर होण्याची भिती व्यक्त केली जात आहे, ते वास्तव वाटते. ती अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी ठरू शकते.

संविधान सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाचा दाखला देवून कम्युनिस्ट कसे संविधान विरोधी आहेत, ते वर्तमान काळात सांगणारी मंडळी बरीच आहे. मग यापूर्वी सुद्धा संविधान बदलविण्याची भाषा अनेकदा उपटसुंभाकडून केली गेली, त्यांच्या विरोधात काय कारवाई झाली? अलिकडेच कोणी तरी संविधान बदलविण्याचे समर्थन करणारे पुस्तक प्रसिद्ध करणार असल्याचे वाचण्यात आले. त्या पुस्तकाच्या प्रकाशनाची परवानगी नाकारण्यात आली, परंतु त्यावर कारवाई झाली काय? ही सगळी वर्तमान काळातील डावी कडवी मंडळी नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. संविधानाचा विस्तृत विस्तार म्हणजे कार्यकारी मंडळ, विधिमंडळ आणि न्यायपालिका. जरी या तिघांना वेगवेगळी कार्ये करायची असली तरी, त्यांची कार्यसिद्धी म्हणजे संविधानातील उद्दिष्टांची पूर्ती करणे. ते अधिकारांचे पृथक्करण करते. ते हुकूमशाहीला दूर ठेवते, वैयक्तिक स्वातंत्र्याचे रक्षण करते, कार्यक्षम प्रशासन निर्माण करण्यास मदत करते, न्यायपालिकेचे स्वातंत्र्य अबाधित राहते, कायदेमंडळाला मनमानी किंवा असंवैधानिक कायदे करण्यापासून रोखते. भ्रष्टाचार, घराणेशाही, सत्तेचा गैरवापर होण्यास टाळते आणि खऱ्या अर्थाने प्रजेचे राज्य अस्तित्वात येते.

हिटलरच्या धोरणांचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याला पूर्णतः विरोध होता. त्याने हे सुनिश्चित केले की फक्त नाझी विचारसरणीच लोकांपर्यंत पोहोचावी. लोकांच्या विचारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्याने भीती, हिंसा आणि खोटेपणाचा वापर केला. हे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पूर्णपणे उल्लंघन होते. तो जेव्हा सत्तेवर आला, तेव्हा लवकरच हुकूमशाह बनला. नाझी पक्षाच्या विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी आणि लोकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रचार यंत्रणेचा पूर्णपणे वापर केला. त्याने स्वतःचा गोदी मीडिया तयार केला होता. रेडिओ, चित्रपट आणि साहित्य यांच्यावर कठोर सेन्सॉरशिप लागू करण्यात आली होती. सरकारची टीका करणारे लेखक, पत्रकार, बुद्धिजीवी आणि कलाकार यांना तुरुंगात टाकण्यात आले किंवा ठार मारण्यात आले. कार्यकारी मंडळ, विधिमंडळ, न्यायपालिका आणि निवडणूक संस्था आपल्या ताब्यात घेतल्या आणि लोकशाहीच्या माध्यमातून हुकूमशाही निर्माण केली. वर्तमान काळात चीन, रशिया येथे लोकशाही दिसत नाही आणि अध्यक्षीय प्रणालीतून निवडून आलेले अमेरिकेतील अध्यक्ष सुद्धा मनमानी पद्धतीने वागतांना दिसतात.

अटलबिहारी बाजपेयी यांनी भूक, भय, भ्रष्टाचार विरोधी नारा दिला होता. त्यामध्ये 'भय'मुक्ती ही अभिव्यक्तीची स्वतंत्रता त्यात अंतर्भूत होती. परंतु भीमाकोरेगाव येथे 1 जानेवारी 2018 ला अभिवादनकर्त्या जनसमुहावर प्रचंड प्रमाणात दगडफेक करण्यात आली आणि सोमनाथ सूर्यवंशीचा ज्याप्रमाणे शेवट झाला. ही 'भयमुक्ती' अर्थात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी आणि ऐसीतैसी ठरते. कोरोना काळात गंगेत प्रेते तरंगताना दाखविल्या प्रकरणी काही वृत्तपत्रांना त्याचे परिणाम सोसावे लागले. सध्या दिल्लीसह देशभरात सत्ताधाऱ्यांची माध्यमांवर करडी नजर आहे. सत्ताधाऱ्यांविरोधात काही छापले गेले की, ताबडतोब फोन फिरवले जातात. माध्यमस्वातंत्र्याची अशी गळचेपी होण्याच्या काळात सत्ताधाऱ्यांना इंदिरा गांधींवर टीका करण्याचा नैतिक अधिकार खरेच आहे का', असा प्रश्न उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उपस्थित केला होता. तर संसदेत पत्रकारांना वेगळे स्थान बहाल केल्याबद्दल अखिलेश यादव यांनी आवाज उठवला होता. देशाची सार्वभौम सुरक्षा अथवा मतदारयादीच्या संदर्भात कोणी प्रश्न उपस्थित केले तर त्या संदर्भात 'अराजकतत्व', 'विध्वंसक' संवैधानिक संस्थेवर हल्ला वगैरे शेलक्या भाषेत भडीमार सुरू होतो. राजकीय पक्षावर टीका करणे म्हणजे देशद्रोही अशा संकल्पना जन्माला येत आहेत. अटलबिहारी बाजपेयी सुद्धा प्रधानमंत्री होते. परंतु 2014 पासून स्वातंत्र्य मिळाले असे काही जन म्हणतात तर राम मंदिराच्या प्रस्थापनेपासून या देशाला स्वातंत्र्य मिळाल्याचे सुद्धा सांगितले जावू लागले. मग ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी इंग्रजांशी लढा दिला, बलिदान दिले आणि 1947 ला देश स्वतंत्र झाला, संविधान लागू झाले आणि प्रजासत्ताक देश अस्तित्वात आला, हे सत्य नाही काय? डॉ. दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश इत्यादी प्रकरणे केवळ व्यक्तींची नव्हे, तर अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हत्या ठरते. स्वातंत्र्याची आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची व्याख्या आणि व्याप्ती आजकाल न्यू इंडियामध्ये बदलत चालली, ती संविधानाला अनुसरून आहे काय? प्रत्येक व्यक्तीला भयमुक्त जगता आले पाहिजे, हेच संविधानिक स्वातंत्र्याला अभिप्रेत आहे. ■■



पुरूषोत्तम संबोधी
मो. 9422803760

# स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव




15 ऑगस्ट 1947 रोजी भारत देश स्वतंत्र झाला म्हणून हा भारताचा राष्ट्रीय सण आहे. तेव्हापासून हा दिवस भारताच्या इतिहासातील सुवर्ण दिन असल्यामुळे तो संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. 2022 ला देशाच्या स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झाल्यामुळे गेल्या तीन वर्षापासून आपण संपूर्ण भारतभर स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव मोठ्या थाटामाटाने व उत्साहात साजरा करत आहोत. स्वातंत्र्याच्या आधी सुमारे दीडशे वर्ष आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामीत होता. 15 ऑगस्ट 1947 रोजी आपल्याला इंग्रजांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य मिळाले. ते मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राण्यांची आहुती दिली. आज आपण मुक्तपणे जो श्वास घेतो तो याच देशपुत्रांमुळे. आजही स्वातंत्र्यानंतर भारताचे सैन्य स्वतंत्र भारताच्या सीमेवर उभे आहेत, ज्यामुळे आम्ही भारतीय आनंदाने आणि सुखाने देशात संचार करू शकतो. आजचा हा दिवस आपल्याला त्या शूरवीरांच्या बलिदानाची, त्यांच्या समर्पण तथा कष्टाची आठवण करून देतो. आपण त्यांच्या प्रती कृतज्ञता तथा आदर व्यक्त करण्यासाठी संपूर्ण भारतभर ध्वजारोहण करून त्यांच्या बलिदानाची आठवण करत असतो. त्यांच्या प्रति आपल्या भावना व्यक्त करून त्यांच्याकडून आदर्श घेत असतो. या दिवशी सगळीकडे देशभक्तीचे व आनंदाचे वातावरण असते. शाळा महाविद्यालय तसेच कार्यालयांमध्ये झेंडावंदन करून देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. आपल्या देशाचे प्रधानमंत्री दिल्लीच्या लाल किल्ल्यावर झेंडा फडकवतात. सगळीकडे आनंदाचे व उत्साहाचे वातावरण असते. आपला भारत देश जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य आहे. आपल्या देशाला प्रगती प्रथावर नेण्यासाठी आपण सर्वांगीण प्रयत्न केले पाहिजेत. राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण करून राष्ट्रीय प्रतीकांचा आदर करणे हे आपले कर्तव्य आहे ते आपण कटाक्षाने पाळले पाहिजे. 15 ऑगस्ट हा दिवस सर्व भारतीयांसाठी खूप महत्त्वाचा आहे. या दिवशी आपण ज्या ज्या शूरवीरांनी, नेत्यांनी, पुढाऱ्यांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी प्राण्यांच्या आहुती दिल्या त्यांना नमन करून त्यांच्या बलिदानाप्रती नतमस्तक झाले पाहिजे. 15 ऑगस्ट या दिवसाला आपण स्वातंत्र्य दिन असे म्हणतो कारण याच दिवसापासून आपल्या देशावरील इंग्रजांची गुलामी नष्ट होऊन आम्ही सर्व भारतीय स्वतंत्रपणे मुक्त श्वास घेऊ लागलो. ते स्वातंत्र्य टिकून ठेवणे आज आम्हा सर्वांचे कर्तव्य आहे. त्यासाठी आम्हाला भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या मूल्यांची रुजवणूक करावी लागेल. जेणेकरून प्रत्येक भारतीयांच्या मनात देश प्रेमाची भावना वाढीस लागेल. ज्यामुळे देश दिवसेंदिवस प्रगतीची अनेक शिखरे पार करेल. ■■

- जोया मुजीब पटेल
वर्ग 6 वा
जि. प. मराठी उच्च प्राथ. शाळा उकळी बु.
ता. संग्रामपूर जि. बुलढाणा

# 'हम नहीं है आदमी, हम है झुनझुने'

26 जानेवारी 1950 संविधान लागू झाले. देशात मनुवादी धार्मिक आचारसंहिता संविधान बाह्य ठरवून, स्विकृत घटनेद्वारे देशाचा राज्यकारभार चालवण्यास सुरुवात झाली. घटनेनुसार भारत धर्मनिरपेक्ष देश आहे. परंतु सरकार धर्मनिरपेक्ष आहे काय? कारण मागील 11 वर्षात देशाला धर्मांधतेत ढकलून देशाचे मनुवादीकरण करण्याची प्रक्रिया जोमाने सुरू आहे. सरकारी कार्यालयात कोणत्याही एका धर्माची पूजा करणे हे असंवैधानिक आहे.



सरकारचे कार्य केवळ शासन चालविणे एवढेच नव्हे तर रुढीवादी, कर्मकांडी विचारधारेतून समाजाला मुक्त करून विज्ञानवादी बनवणे होय. परंतु देशाचे प्रधानमंत्रीच अधिकांश वेळ कर्मकांड करत आहेत. कधी गंगा मां की पूजा तर कधी विविध मंदिरात धार्मिक अधिष्ठान करतात. अलीकडे काही घटना विचलित करणाऱ्या आहेत. राज्य शासनाच्या प्रत्येक शाळेत पसायदान पठण अशी बातमी पुण्य नगरी मध्ये 14 ऑगस्ट 2025 रोजी प्रकाशित झाली. 30 जुलै 2025 रोजी महाराष्ट्र शासनाने काढलेल्या परिपत्रकानुसार, ज्ञानेश्वर महाराजांची सप्तशतकोत्तर (750) जयंती 15 ऑगस्ट 2025 रोजी साजरी केली. राज्यातील प्रत्येक शहरामध्ये महानगरपालीका, नगरपालीका, नगरपरिषदा या कार्यालयाने ज्ञानेश्वर महाराजांच्या मूर्तीची पालखीतून मिरवणूक काढून उत्सव साजरा करावे, असे आदेश दिले होते. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच गोकुळ अष्टमी साजरी करण्याचे ही शाळांना आदेश दिले आहेत. अर्थात शिक्षण क्षेत्र मनुवादी विचारधारेने प्रेरित झाले आहे. सरकारला संत गाडगेबाबा, चोखामेळा, संत कबीर यासारख्या संतांचे कार्य दिसत नाही.

2014 नंतर जागृत देवस्थान, नवसाला पावणारे गणपती व प्राणप्रतिष्ठा, सोहळे यांचे पेव फुटलेले दिसते. प्रशासकीय कार्यालयात सरकारी खर्चाने उघडपणे देवीदेवतांची पूजाअर्चा करणे सुरू झाले आहे. पोलिस स्टेशन, न्यायालये, शिक्षण संस्था व सरकारी कार्यालयात गणपती बसविले जात आहे. महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सव ला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला. गणेशोत्सव राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर साजरा करण्याची घोषणा राज्याचे सांस्कृतीक मंत्री आशीष शेलार यांनी केली आहे. देशात हनुमान जयंती, सत्यनारायण पूजेचे स्तोम हे सरकारी कार्यालयात, सार्वजनिक ठिकाणी आणि बहुजनांच्या घरोघरी पसरलेले दिसते. सत्यनारायण व यज्ञ संस्कृतीला तेवत ठेवण्याचे काम तथाकथित सरकारी ब्राह्मण व व्यावसायिक प्रसारमाध्यमे उघडपणे करत आहेत. उत्तराखंड मधील शालेय अभ्यासक्रमात गीता शिकवली जात आहेत. एके काळी संस्कृत भाषा इतरांनी शिकू नये म्हणून जीभ कापली जायची. आता संस्कृत देवभाषा म्हणून गौरविण्यात येत आहे. संस्कृत ही व्यावहारिक भाषा व्हावी असे आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांनी म्हटले आहे. नागपूर जवळील रामटेकला कालिदास विद्यापीठ आहे. त्या विद्यापीठांतर्गत भारतात 50 गुरुकुल शाळेची निर्मिती झाली आहे. या विद्यापीठाची ना कुठे जाहिरात आहे ना वाच्यता. सरकारच्या 'सेतुबंध विद्वान योजना' द्वारे गुरुकुलच्या विद्यार्थ्यांना थेट आयआयटी मध्ये प्रवेश मिळणार आहे. आयआयटी होताच त्याला मोठ्या पदाची सरकारी नोकरी. यात बहुजन मागासवर्गीय, वंचित कुठे दिसत नाही. याशिवाय इतिहास बदलण्याचे कार्य सरकारी स्तरावर होत आहे. CBSE पॅटर्न, 5 व्या वर्गाच्या पुस्तकात ग्रेट पर्सनालिटी मध्ये सोक्रेटीश, कार्ल मार्क्स, मार्टिन लुथर किंग, महात्मा गांधी, संत मदर टेरेसा, सरदार वल्लभभाई पटेल आहेत. स्वातंत्र्य योद्धे म्हणून सरदार पटेल, सुभाष चंद्र बोस, गंगाधर टिळक, लाला लजपतराय आहेत. इंदिरा गांधी, सुषमा स्वराज, नरेंद्र मोदी यांची सुद्धा नावे पुस्तकात आहेत. परंतु बुद्ध, फुले, शाहू आणि राष्ट्र उभारणीत योगदान असणाऱ्या डॉ. बाबासाहेबांचा कुठेही उल्लेख नाही. CBSE मान्यतेचे दिल्लीच्या गोयल ब्रदर प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. नागरिकांचे शिक्षण, आरोग्य, नोकरीची जबाबदारी सरकारची असते. परंतु वर्तमान सरकार लोकांना धर्मांध बनविण्यात व्यस्त आहे. 'मानवासाठी धर्म आहे, धर्मासाठी मानव नाही' हा डॉ. बाबासाहेबांचा विचार हद्पार झाला आहे. आजचे तरुण धर्मनिरपेक्षता म्हणजे काय? हे समजून न घेता धर्मनिरपेक्षतेच्या विरोधी होऊ लागला आहे. प्रधानमंत्री सर्व जाती धर्माच्या नागरिकांनी निवडून दिलेला असतो. तो केवळ भाजपाचा प्रधानमंत्री नसून प्रत्येक नागरिकांचा असतो. परंतु स्वतः प्रधानमंत्री केवळ हिंदू धर्माचे राजकारण करत आहे. अयोध्येत त्यांनी रामाची प्राणप्रतिष्ठा केली. 14 फेब्रुवारी 2024 रोजी आबुधाबीमध्ये भव्य मंदिर उभारले. देशात असंख्य मंदिरांची निर्मिती केली. मंदिरे उभारणीत नागरिकांच्या कराचा कोट्यावधी उधळले आहेत. प्रधानमंत्र्यांनी मागील 11 वर्षात बहुतांश मंदिर निर्माण, मंदिरांचे सौंदर्यीकरण करण्यात आपला वेळ खर्ची घातला आहे. उत्तर प्रदेश मधील काल्की धाम मंदिराचे उद्घाटन प्रसंगी प्रधानमंत्री म्हणाले कि 'ईश्वर ने मुझे राष्ट्ररूपी मंदिर के निर्माण का काम सौपा है. कवी दुष्यंतकुमार यांच्या शब्दात 'जिस तरह चाहो बजाओ इस सभा में, हम नहीं है आदमी, हम है झुनझुने' अशी लोकांची दशा झाली आहे. ■■



श्रीराम बनसोड,
मो.8208617748

# माणसाने माणसाशी सौख्याने वागावे!

आपल्या प्रिय भारत देशाला इंग्रजी राजवटीच्या पारतंर्त्यातून 15 ऑगस्ट 1947 ला देशाला पवित्रतेचे श्रेय मिळाले. ती आजपावेतो आपण जोपासुन इतिहासातील पवित्र घटनांची स्मृती कायम ठेवूनच आज आपण देशात 78 वा स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत. भारतीय स्वातंत्र्याच्या 77 व्या वर्धापन दिना निमित्त आम्ही भारतीय आहोत याबाबत आम्हाला आत्मविश्वासच नाहीतर अभिमान आहेच. भारतातच नव्हे तर संपुर्ण जगात आम्ही भारतीय आहोत याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. तो टिकवून ठेवण्याची गरज आज भासू लागली आहे, कारण देश ढासळू पाहत आहे.



भारतीय स्वातंत्र्याची मुर्हुतमेढ 1857 मध्येच रोवल्या गेलेली होती. या मुर्हुतमेढीवर भारतीय तिरंगा फडकविण्यास 90 वर्षाचा कालावधी लागला. या कालावधीत ही मुर्हुतमेढ अधिक सक्षम करण्यासाठी थोर क्रांतीकारकांचे बलिदान तसेच थोर नेत्यांची विचारसरणी व परिकाष्ठा लाभलेली आहे. तसेच या थोर नेत्यांची दिर्घ परंपरा सुध्दा या देशाच्या अस्तित्वाची साक्ष देते. या स्वातंत्र्याच्या 77 व्या वर्धापन दिनी अशा थोर नेत्यांचे स्मरण करुन त्यांच्या प्रती नतमस्तक होणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे. भारताची राज्यघटना तयार करण्यात भारतरत्न, विश्वरत्न, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणुन त्यांचा सिंहाचा वाटा आहे. प्रजासत्ताक भारताचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू व पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद होते. हा 78 वा स्वातंत्रदिन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नव्या भारतास घटना समर्पीत केली, तो आम्हाला भारतीय असण्याचा अभिमान आहे. भारताचे प्रजासत्ताक देशात रूपांतर होईपर्यंत राज्याचे प्रमुख म्हणून किंग जॉर्ज सहावे हे कायम होते. 26 जानेवारी 1950 रोजी (भारतीय प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो) भारताने राज्यघटना स्वीकारली आणि देशाचा सार्वभौम कायदा असलेले भारतीय संविधान लागू करून हा देश प्रजासत्ताक बनला. मोठ्या प्रमाणावर अहिंसक आंदोलने आणि सविनय कायदेभंगासाठी प्रख्यात झालेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीनंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले होते. आज ग्रामीण भारताला एका मोठया आर्थिक तथा सामाजिक बदलाची गरज आहे. ज्यात शिक्षण, सुदृढ आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण विषयक, आर्थिक तसेच सामाजिक दर्जा सुधारणे की, ज्यामुळे ग्रामीण भागातील उत्पादकता तसेच जीवनस्तर उंचावण्यास मदत होईल. सरकारने हे धोरण सक्तीने अंमलात आणले पाहिजे, तेव्हाच जीवनस्तर उंचावेल. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला, भारताचे राष्ट्रपती 'राष्ट्राला संबोधित' करतात. 15 ऑगस्ट रोजी प्रधानमंत्री हे दिल्लीतील लाल किल्ल्याच्या ऐतिहासिक स्थळाच्या तटबंदीवर भारतीय ध्वज फडकावतात. आपल्या भाषणात प्रधानमंत्री गेल्या वर्षातील कामगिरीवर प्रकाश टाकतात, महत्त्वाचे मुद्दे मांडतात आणि पुढील विकासाचे आवाहन करतात. तसेच ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांना श्रद्धांजली वाहतात. इंग्रजांचा कावेबाजपणा ओळखणाऱ्या काहींनी त्यांच्या विरुध्द शस्त्र उगारले. स्वातंत्र्यासाठी जसे माणसे शहीद झाली तशी वंशावरही संकटे आली. भारतीय समाजाला आपली स्थिती सुधारण्याची प्रेरणा दिली. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रयत्नाने जातीय भेदाभेद किती वाईट आणि त्यामुळे समाज कसा दुर्बल होतो हे लोकांच्या निर्दशनास आले.

'बिझनेस कन्सर्न इन इंडिया' या पाक्षिकामध्ये आम्हाला आमच्या देशाच्या इतिहासाचा थोर अभिमान आहे. आम्ही अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीत स्वातंत्र्याची वाटचाल सुरु केली, परंतू इतर देशाप्रमाणेच आंतरराष्ट्रीय व्यापार हाच आमच्याआजच्या भौतिक बदलास व आर्थिक स्वातंत्र्यास कारणीभुत असल्याचे आमचे ठाम मत आहे. आमच्या देशाच्या मागील 20 वर्षाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केल्यास, आम्ही आमचा जलद आर्थीक विकासास या नविन शतकाच्या सुरुवाती पासूनच सुरुवात केल्याचे स्पष्ट जाणवते, पण तिथेही ठोस अशी पाऊले उचललीत नाही. बहुसंख्य तरुण भारतीयांच्या मते जुनी आर्थिक विषमता कालबाहय झालेली असून येणाऱ्या भविष्यात आम्हाला मोठया सामाजिक आणि आर्थिक आव्हानांना पार करावयाचे आहे. परंतू हे करतांना आम्हाला काही संकटांना समोरे जावेच लागेल, कारण पुढील 10 वर्षेही आताच्या काळपेक्षा सर्वदृष्टीने वेगळे असतील आणि आम्हाला या काळात यशस्वी होण्याकरीता आयुष्याच्या सर्वच क्षेत्रात व्यापार, खेळ, आंतरराष्ट्रीय घडामोडीवर मात करावी लागेल. त्यासाठी ठाम निर्णय घेण्याची गरज आहे, तोंडदेखलेपणा नको. ते आज देशात घडत आहे, हे थांबले पाहिजे.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला आज 77 वर्ष पूर्ण होत आहेत, ही अत्यंत अभिमानाची अन् आनंदाची बाब आहे. स्वातंत्र्य दिनाच्या आजच्या शुभदिनी राष्ट्राची अस्मिता आणि ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वजण कटिबध्द होऊ या. तेव्हाच देश अराजकतेकडे जाणार नाही आणि लोकशाही जिवंत राहिल, याचे भान असणे गरजेचे आहे. भारत माझा देश आहे आणि मी त्याचा मालक आहे हे आमच्या बापाने आम्हाला सांगितले आहे. कोणाच्या सांगण्यावरुन आम्हाला आमची देशभक्ती सिध्द करुन दाखवायची गरज नाही.

आमची देशभक्ती आमच्या रक्तात भिनलेली आहे आणि ती डोळस आहे. स्वातंत्र्य लढ्यात काडीचेही योगदान नसणाऱ्या कुत्र्यांनी आम्हाला देशभक्ती शिकवू नये.

देश हा माणसांनी निर्माण होतो म्हणुन देशातला प्रत्येक माणुस हा सुरक्षित असणे म्हणजे देश सुजलाम सुफलाम असणे होय! म्हणूनच माणसांनी माणसाशी सौख्याने वागावे. 78 व्या स्वातंत्र्यदिनाच्या सर्व देशवासियांना हार्दिक शुभेच्छा! ■■



प्रविण बागडे
9923620919




## बोधीसत्व बुद्ध विहार

संजयगांधी नगर, न्यु नेहरुनगर,मानेवाडा रिंग, नागपूर. विहारामध्ये वर्षावास, पौर्णिमा, बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन हा स्लम एरीया असुन मजूर कामगार वर्ग आहे. बुद्ध धम्म ग्रंथाचे वाचन सुरु आहे. क्रान्ती ज्योती सावित्रीबाई फुले जनविकास मंडळ सचिव उर्षा झामरे, रेखा शंभरकर, वंदना सोमकुवर व सहकारी महिला विहाराचे व्यवस्थापन, सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करीत आहेत

संवाद मित्र डी.आर. कांबळे
मो.8600924170

# सामाजिक लोकशाहीसाठी सर्वांनी एकत्रित येणे गरजेचे : प्रा. देविदास घोडेस्वार

वर्धा : संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व भारतीयांना दिलेली सामाजिक लोकशाही आज धोक्यात आलेली आहे. एका बाजूला 'एक व्यक्ती एक मत' आणि 'एक मत एक मूल्य' ही तत्वे राजकीय लोकशाहीत स्विकारले जात आहेत. परंतु दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये सामाजिक लोकशाहीत पायदळी तुडविल्या जात आहेत. त्याकरिता फुले, शाहू, आंबेडकरी विचारांवर आधारित सर्व संघटनांनी एकत्रित येऊन जनआंदोलन उभारणे गरजेचे आहे असे प्रतिपादन नागपूर येथील संविधानतज्ञ व आंबेडकरी विचारवंत प्रा. देविदास घोडेस्वार यांनी केले. 9 ऑगस्ट 2025 ला बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाचे संस्थापक बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे प्रथम प्रदेशाध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष, थोर आंबेडकरी विचारवंत स्मृतीशेष श्रीकृष्ण उबाळे यांच्या 9 व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाच्या वर्धा येथे आयोजित विदर्भ विभागिय अधिवेशनातील खुल्या सत्रात 'वर्तमान परिस्थितीत सामाजिक लोकशाहीचे भवितव्य,' या विषयावर प्रमुख मार्गदर्शक



म्हणून बोलत होते, या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजकुमार जवादे हे होते तर या विषयावर बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय सल्लागार, 22 प्रतिज्ञा अभियानाचे राष्ट्रीय संयोजक तथा माजी इन्कमटॅक्स कमिश्नर अरविंद सोनटक्के (मुंबई), प्रा. डॉ. सुभाष खंडारे (वर्धा) यांनीही आपले विचार सदर विषयावर सविस्तरपणे ठेवलेत अधिवेशनाच्या प्रारंभी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच स्मृतीशेष श्रीकृष्ण उबाळे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आधिवेशनाचे उद्घाटन ओबीसी नेते तथा आंबेडकरवादी रिपब्लिकन पार्टीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर देवतळे यांनी दिप प्रज्वलन करून केले. स्वागताध्यक्ष शैलेश वासनिक, सहायक निबंधक वर्ग 2 हिंगणघाट यांनी सर्वांचे स्वागत केले. अधिवेशनाच्या प्रथम प्रतिनिधी सत्राच्या अध्यक्षस्थानी बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष प्रा. शेषराव रोकडे हे होते. या प्रतिनिधी सत्रात बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाचे चंद्रपूर जिल्ह्याचे अध्यक्ष संजय खोब्रागडे, अकोला जिल्ह्याचे सुधाकर वासे, अमरावतीचे कैलास सोनोने नागपूर जिल्हाध्यक्ष सुजय वानखेडे, यवतमाळचे महेंद्र अर्जुने, नांदेड जिल्हाध्यक्ष अरविंद गवळे, हिंगोली जिल्हाध्यक्ष वसंत सावंत, हिंगणघाट येथील प्रतिनिधी चेतन ढोरे, मराठवाडा प्रदेश संयोजक प्रा. इंजिनिअर अनंत खोब्रागडे इत्यादी पदाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील संघटनेचा अहवाल सादर केला. या वेळी मंचावर सामाजिक कार्यकर्त्या तथा स्मृतीशेष श्रीकृष्ण उबाळे यांच्या पत्नी निर्मला उबाळे बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय महासचिव पी. एच. गवई राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. चरणदास सोळंके, महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष चैनदास भालाधरे, सचिव नरेश मूर्ती सहसचिव शिवदास कांबळे, आंबेडकरवादी रिपब्लिकन पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष मोहम्मद शफी सौदागर अमरावती येथील पत्रकार गंगाधर नाखले इत्यादी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. संघटनेचा जमाखर्च महाराष्ट्र राज्याचे कोषाध्यक्ष प्रा. अशोक ठवळे यांनी, प्रथम सत्राचे प्रास्ताविक व ठराव वाचन महाराष्ट्र राज्याचे सचिव सिद्धार्थ सुमन यांनी, संचालन महाराष्ट्र राज्याचे संघटन सचिव सिद्धार्थ डोईफोडे यांनी तर आभारप्रदर्शन वर्धा जिल्हाध्यक्ष कमलेश कामडी यांनी केले. खुल्या सत्राचे प्रास्ताविक वर्धा जिल्ह्याचे प्रवक्ते वसंतराव मुरारकर, संचालन महाराष्ट्र राज्याचे महासचिव प्रा. डॉ. रविकांत महींद्रकर तर आभारप्रदर्शन कोषाध्यक्ष प्रा. अशोक ठवळे यांनी केले.

## कॉ. अरुण वनकर यांचा मरणोत्तर देहदान संकल्प पुर्ण

नागपूर : सामाजिक - राजकीय पदाधिकारी तथा भाकप चे नेते कॉ. अरुण वनकर यांचे 13 ऑगस्ट ला वयाच्या 65 व्या वर्षी निधन झाले. कॉ. अरुण वनकर विद्यार्थी- युवा अवस्थेपासून सामाजिक - राजकीय चळवळीत सक्रिय होते.




त्यांनी ऑल इंडिया यूथ फेडरेशन च्या माध्यमातून असंख्य जन आंदोलन केलीत, कॉ. अरुण वनकर डी.एड, बी.एड तसेच बी.पी.एड सोबत शेतकरी- शेतमजूर-कष्टकरी ,दलित - आदीवासी हक्क अधिकारासाठी आजन्म लढले.1990 ला मंडल आयोग लागू झाल्यानंतर नागपूर जिल्ह्यात मंडल ज्योतयात्रा काढलेली होती. काँग्रेस सरकार आणि भाजप सरकाराच्या नविन आर्थिक व औद्योगिक धोरण तसेच खाजगीकरण धोरणाच्या च्या विरोधी आंदोलनात त्यांचा सक्रीय सहभाग राहिलेला आहेमनपातील अस्थायी कर्मचाऱ्यांना कायम करण्यात यावे या व? इतर ज्वलंत प्रश्नांवर सुध्दा अनेक आंदोलने केलीत.

संपुर्ण विदर्भात अन्याय- अत्याचारा विरोधात एक लढवाव्य तसेच इमानदार व प्रामाणिक नेतृत्व म्हणून त्यांची ख्याती होती.

आपल्या जीवनात त्यांनी स्वतःची शारिरीक प्रकृती ठीक नसतांना सुध्दा लोकांच्या हक्क- अधिकारासाठी नेहमीच फ्रंटवर ते असायचे.

अशा बहुआयामी व्यक्तींनी अनेक वर्षांपूर्वी मरणोत्तर देहदानाचा संकल्प सुध्दा केलेला होता, त्यानुसार आज त्यांच्या मृत्यूनंतर कॉ.अरूण वनकर यांचा मरणोत्तर देहदानाचा संकल्प मेडीकल कॉलेजमधील शरीरशास्त्र विभागात असंख्य सामाजिक - राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पुर्ण करुन त्यांना क्रांतीकारी अभिवादन करण्यात आले आणि कॉ. अरून वनकर को लाल सलाम लाल सलाम तसेच कॉ. वनकर अमर रहे, अमर रहे! अशा घोषणा देवून शेवटचा निरोप देण्यात आला.

### शिक्षण धोरण 2020 विरोधात जनहित याचिका दाखल करण्यासंदर्भात

## धम्मसंगोष्टीच्या 355 व्या सभेत चर्चा

नागपूर : भारतीय संविधानाने प्रत्येकांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला. सर्वांना दर्जेदार शिक्षण देण्याची नैतिक जबाबदारी सरकारची आहे, परंतु हश्वक्क 2020 अभ्यासली तर संपूर्ण देशात सरकारने ग्रामीण आणि शहरी वंचित क्षेत्रातून शाळा बंद करण्याचा सपाटा लावला आहे. त्यातील तरतुदी तर शिक्षणाचे स्तरीकरण, न फा खो री, खाजगीकरणाला प्रोत्साहित करणाऱ्या आहेत. या धोरणात संविधानाच्या अनेक कलमांचे उल्लंघन केले जात आहे. गुरुकुल सारख्या कालबाह्य आणि भेदभावपूर्ण शिक्षण संकल्पनेला प्रोत्साहित करणाऱ्या आहेत, असे धम्मसंगोष्टीच्या 355 व्या




सभेचे वक्ते हरिश्चंद्र सुखदेवे यांनी विचार व्यक्त केले. शिक्षण धोरण 2020 आणि त्याची विसंगत अंमलबजावणी विरुद्ध जनहित याचिका करण्यात यावी. यासाठी जनजागृती करून पुढील दिशा ठरवण्यासाठी 18 ऑगस्ट 2025 रोजी सायंकाळी 6 वाजता बानाई सभागृहात डॉ. सुखदेव थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सभा आयोजित करण्यात येत आहे. साभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे सुखदेवे यांनी सभेला आवाहन केले.

मनुवादी व्यवस्थेत शुद्रांना शिक्षणाचा अधिकार नाकारला होता. गुलामी लादली होती. आज सरकारी शाळा बंद करून परत गुलामी लादण्याचे प्रयत्न होत आहे. काही शाळा मंदिराकडे हस्तांतरित केल्या जात आहेत असे सभेचे अध्यक्ष प्रा. रंजन वासेकर यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात शशिकांत बनकर यांच्या धम्मगीताने झाली. सभेत अन्नपुर्णा दुपटे, अरुणा घनमोडे, रेखा मुन आणि मोहन बडोले यांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. सभेचे संचालन इंजि. शुद्धोदन बडवणे आणि आभार सुधाकर दूबे यांनी मानले.

### महत्वाचे

## लोटस पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन समारंभ



नागपूर : शाक्यमुनी मेमोरियल ट्रस्टद्वारा संचालित लोटस पब्लिक स्कूल आणि ज्युनियर कॉलेज, म्हाळगीनगर चौक येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त 15 ऑगस्ट रोजी सकाळी 9 वाजता दैनिक बहुजन सौरभचे मुख्य संपादक ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. याप्रसंगी दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजूकर अतिथी म्हणून उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप आगलावे हे राहतील. अशी माहिती संस्थेचे सचिव प्रा. नाना शेंडे यांनी एका पत्रकाद्वारे दिली.

## एक राखी व्यसनमुक्तीची... व्यसनांपासून रक्षणाची : डॉ. रविंद्र सिंगल



नागपूर : पारंपारिक रक्षाबंधन सणाला बहीण भावाला रक्षणार्थ राखी बांधत असते व भाऊ बहिणीच्या रक्षणार्थ पैसे, कपड्यांच्या स्वरूपात ओवाळणी देत असतो. परंतु याला सामाजिक सणाला पर्याय जोडून 'व्यसनमुक्तीशी बंधन.. व्यसनांपासून रक्षण..' हा नावीन्य पूर्ण उपक्रम पोलीस आयुक्त कार्यालयात संपन्न झाला. रक्षाबंधनाच्या पर्वावर आय. पी. एस. पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांना सामाजिक बांधिलकी जोपासणारे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे नागपूर जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी चक्क व्यसनमुक्तीची राखी बांधून व्यसनमुक्तीचा संदेश दिला. यावेळी एक राखी व्यसनमुक्तीची.. व्यसनांपासून रक्षणाची.. असे मत डॉ. सिंगल यांनी व्यक्त केले. नुकतेच नशामुक्त भारत अभियानांतर्गत शहराला 'व्यसनमुक्त नागपूर' व शाळांमध्ये 'अँटी ड्रग क्लब' बनविण्यासाठी ऑपरेशन थंडर यासारख्या उपक्रमात व्यसनमुक्तीच्या राखीने भर घातली आहे. यावेळी पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महिला पोलीस कॉन्स्टेबल पायल यादव, प्रियंका सरोदे, निधी बुरले उपस्थित होते.

## एज्युकेशन एम्पावरमेंट ऑफ अंडर प्रिव्हिलेज गर्ल्स फाउंडेशनतर्फे स्कॉलरशिपसाठी अर्ज सादर करावा

नागपूर : वंचित वर्गाच्या मुलींच्या उच्चशिक्षणासाठी समर्पित असलेल्या 'Educational Empowerment of under-previledged Girls Foundation' च्या वतीने अंडर प्रिव्हिलेज 12 वीनंतर मुलींना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत प्रदान केली जाते. या scholarship साठी योग्यता आहे, 1) बारावीच्या परीक्षेत 80टक्के किंवा यापेक्षा अधिक मार्क्स आणि 2) कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वर्षाला चार लाख किंवा त्या पेक्षा कमी, 3) सध्या शिक्षण घेत असलेल्या असलेल्या शैक्षणिक संस्थेचे ID कार्ड. SC/ST/ OBC/ NT आणि अल्पसंख्यांक वर्गाच्या विदर्भातील गरजू मुलींनी या शिष्यवृत्तीसाठी अर्ज खालील पत्त्यावर 12 वी ची मार्कलिस्ट, जातीचे प्रमाणपत्र व कुटुंबाच्या उत्पन्नाच्या दाखल्या सहित खालील पत्त्यावर पाठवावे असे आवाहन हरेश निमजे, एच. के. असोसिएट गोळीबार चौक, विकास कुंभारे यांचे कार्यालयासमोर, नागपूर-02,
मो. 7020456162 यांनी केले आहे.

## प्रा. रामेश्वर नारनवरे यांना आदरांजली



कळमेश्वर : इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय कळमेश्वर येथील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. रामेश्वर नारनवरे यांचे बुधवारी कळमेश्वर येथे अल्पआजाराने निधन झाले. ते 42 वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी व मुलगा आहे. नरखेड येथे अंतिमसंस्कार करण्यात आले. प्राचार्य डॉ. अजय चिकाटे यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात आदरांजली सभा घेण्यात आली. सभेत प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रा. नारनवरे यांना भावपुर्ण आदरांजली अर्पण केली.

प्राचार्य चिकाटे यांनी प्रा. नारनवरे यांच्या अकाली निधनाबद्दल शोक व्यक्त करुन श्रद्धांजली अर्पण केली. पीपल्स वेल्फेअर सोसायटीचे सहसचिव धर्मेंद्र बनसोड यांनीही शोकसंवेदना व्यक्त केली. शांत व मनमिळाऊ शिक्षक म्हणून ते ओळखल्या जात होते. याप्रसंगी प्रा. राजेंद्र कांबळे, प्रा. गणेश जोत, हेमंत बागडे, राजेश घोडेस्वार, निधी गुप्ता, मलिक जावेद परवेज, रोशन भगत, राकेश लोहकरे, किशोर दुर्गे, मंजुषा ढोबळे, मनोज उगले, मंजुषा कापसे, दीपा बिडकर, हर्षा गाणार यांनीही या सभेत आदरांजली अर्पण केली. सुकन्या घाटोळे, चेतन ठवरे, कवडु बागडे, प्रवीण पाटील सह विद्यार्थी मोठ्या संख्येने आदरांजली सभेत हजर होते.

## पुसद येथे रविवारी रंगणार एक दिवसीय गझल संमेलन

यवतमाळ : गझल मंथन साहित्य संस्था व यवतमाळ जिल्हा कार्यकारिणीतर्फे पुसद (जि. यवतमाळ) येथे रविवार, दि. 17 ऑगस्ट रोजी विदर्भ विभागीय एकदिवसीय मराठी गझल संमेलन आयोजित केले आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून महाराष्ट्राचे ख्यातनाम गझलकार श्रीकृष्ण राऊत यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध गझलकार शिवाजी जवरे यांच्या हस्ते होणार आहे.

या संमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून गझलकार जयवंत वानखडे व गझलकार अमोल शिरसाट उपस्थित राहणार आहेत. गझलकार निलेश कवडे संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. सुप्रसिद्ध गझलकार गंगाधर मुटे यांना संमेलनात जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

याच संमेलनात श्रीकृष्ण राऊत यांचे 'गझलचे उपयोजित छंद - शास्त्र' आणि गझलकारा आरती पद्मावार यांचे 'इच्छा घार होताना' या



पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. या कार्यक्रमाचे संचालन सोनल गादेवार व स्मिता पांडे करतील.

यानंतर संमेलनात एकूण सहा मुशायरे रंगणार आहेत. या मुशायऱ्यांचे अध्यक्षपद श्रीकृष्ण राऊत, अमोल शिरसाट, तेजस भातकुलकर, सुभाष मगर, सुनंदा भावसार आणि स्नेहा शेवाळकर भूषवतील तर संचालन मारुती मानेमोड, प्रीती वाडीभस्मे, दिपाली सुशांत, चेतन पवार, दिपाली कुलकर्णी आणि निशा डांगे करतील. या गझल संमेलनात विदर्भ, मराठवाडा तसेच महाराष्ट्रातील गझलकार सहभागी होणार आहेत.

हे संमेलन नवीन पुसद येथे रविवार, दि. 17 ऑगस्ट रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 6 या वेळेत स्टेट बँकेजवळील राजे उदाराम मंगल कार्यालयाच्या सभागृहात रंगणार आहे.

या गझल संमेलनाचा गझल रसिकांनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन गझल मंथन साहित्य संस्थेचे अध्यक्ष अनिल कांबळे, उपाध्यक्ष वसुदेव गुमटकर, संयोजक डॉ. शिवाजी काळे, डॉ. स्नेहल कुलकर्णी, संमेलन समितीचे अध्यक्ष ॲड. मुकुंदराव जाधव, समन्वयक प्रदीप तळेकर, यवतमाळ जिल्हाध्यक्षा स्नेहा शेवाळकर, शहर संयोजक निशा डांगे, यवतमाळ जिल्हा कार्यकारिणी व विदर्भ विभागीय कार्यकारिणीतर्फे करण्यात आले आहे.

## प्रज्ञाज्योत बुद्धविहारात वर्षावास अंतर्गत श्रावण पौर्णिमेनिमित्त प्रवचन



नागपूर : प्रज्ञाज्योत बुद्धविहारात वर्षावास अंतर्गत श्रावण पौर्णिमेनिमित्त प्रवचन कार्यक्रमाचे मुख्य प्रवचनकार राष्ट्रीय बौद्ध महसभ संस्कार समितीचे अध्यक्ष इंजि. शुद्धोधन बडवणे विचारमंचावर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विहाराचे अध्यक्ष एन.व्ही बहादूरे यांची उपस्थिती होती. इंजि. बडवणे यांचे स्वागत एन.व्ही. बहादूरे यांनी केले. विशेष अतिथी उत्तम उके हे होते. त्यांचे स्वागत राजन सोनटक्के यांनी केले. प्रवचनाचा विषय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक संकल्पना आणि आर्थिक स्थिती' असा होता. आपल्या विषयानुसार बडवणे यांनी प्रवचन केले. संचालन आशा वासे यांनी केले, असे प्रखर विचार व्यक्त केले. तेव्हापासून ही विषमतावादी समाज व्यवस्थाच बदलून टाकून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यावर अर्थात तथागत बुद्धाच्या तत्वावर भारत देशाचे संविधान बनविण्याची संकल्पना मनाशी बाळगून संविधान सभेत निवडून जाण्याचे आटोकाट प्रयत्न केले आणि घटना समितीत मसुदा समितीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष झाले. असे श्रोत्यांसमोर प्रगल्भ विचार मंचावरून व्यक्त केले. विशेष पाहुणे उके यांनी सुद्धा धम्मपदातील गाथा समजावून सांगितल्या. उत्तम उके यांनी धम्मपालन गाथानी कार्यक्रमाची सांगता केली. विहाराचे कोषाध्यक्ष भगवान निमगडे यानी आभार प्रदर्शन केले.

# थायलंड येथील उद्योजक राज वासनिक यांचा सत्कार

नागपूर : अशोका मैत्रेय फाउंडेशनद्वारा संचालित शाल वन बुद्ध विहार अंतर्गत भारत जन्मभूमी असलेले परंतु थायलंड या ठिकाणी वास्तव्यास असलेले उद्योजक व ज्येष्ठ समाजसेवक राज वासनिक यांचा सत्कार समारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी पूज्य भदंत धम्मरक्षित होते. तर उद्घाटक म्हणून प्रकाश गजभिये, माजी आमदार होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध उद्योजक प्रवीण वानखडे, आकाश सोनटक्के, प्रविन डोंगरे होते.



कार्यक्रमाचे अध्यक्ष असलेले पुज्य भदंत धम्मरक्षीत यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कशा प्रकारे पुढे गेलेल्या लोकांकडून जी अपेक्षा केली. त्या अपेक्षेची पूर्तता करणे ही सामाजिक जबाबदारी आहे व त्याच दिशेने जाण्याचे काम करणाऱ्यांपैकी एक म्हणजे राजजी वासनिक होत, असे उद्गार काढले तसेच उद्घाटक म्हणून लाभलेले प्रकश गजभिये माजी आमदार यांनी तथागतांनी दिलेला धम्म जर आत्मसात केला. तरच आपली खरी व्यक्तिगत तसेच सामाजिक उन्नती होऊ शकते. याचे उदाहरण म्हणजे राज वासनिक होत, असे उद्गार काढले. प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले प्रसिद्ध उद्योजक प्रवीण चांगदेवराव वानखडे यांनी राज वासनिक यांचा संघर्षमय जीवनाचा प्रवास उलघडवून दाखविला, सत्काराला उत्तर देतांना राज वासनिक यांनी संघर्ष केल्याशिवाय यश प्राप्त होत नाही. तर संघर्ष करावाच लागतो. ही भूमिका प्रतीपदित केली. तसेच आपण समाजाचे देणे लागतो. या भूमिकेतून प्रत्येकाने काम केले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करताना माझ्याप्रमाणे बौद्ध समाजामध्ये उद्योजक व्हावे. त्यासाठी मी कटिबद्ध आहे असे उद्गार काढले. तसेच शालवन बुद्धविहारला ताथागत बुद्धांची सहा फुट उंचीची मूर्ती भेट देणार ही भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाची प्रस्तावना भंते हर्षदीप यांनी केले, तर संचालन प्रणित सुखदेवे यांनी केले तर आभार प्रदर्शन बादल श्रीरामे यांनी केले. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी शालवन बुद्धविहार समितीचे पदाधिकारी संदीप पानतावणे, प्रवीण मेश्राम, अमोल शेंडे, प्रणित सुखदेवे, सिद्धार्थ बंसोड, विशाल धाकडे, कला थुल, सविता डोंगरे, इंदू गजघाटे, आनंद भालाधरे, सुमित बनसल, निखिल गजघाटे, संदीप कांबळे, सौरभ गजघाटे, सुषमा कांबळे, दीपक पानतावणे, अंश सिरसाठ, ताराचंद बोरकर, गोविंदराव सिरसाठ, आदींनी परिश्रम घेतले.

PROPERTY FOR SALE


Prime Land with Construction for Sale
Wela (Hari), Shankarpur Road, Nagpur (Gramin)
Perfect for Educational Institutions:
Area 0.46 hectares (50,000 Sq. Ft) with construction around 35000 Sq. Ft., Ideal for Schools, College, Training Center, Residential Tution College, Hotel, Hostel, Ambusman Park
Contact : Sulay 9860361121

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648